# वसई-विरार शहर महानगरपालिका
## वैद्यकीय आरोग्य विभाग

दि.२९/०७/२०२४

**निक्षय मित्र संकल्पनेअंतर्गत डिग्निटी सामाजिक संस्थेमार्फत क्षयरुग्णांना पोषक आहाराचे वाटप**

मा.राष्ट्रपती महोदयांनी दिनांक ०९/०९/२०२२ रोजी "प्रधानमंत्री क्षयरोग मुक्त भारत अभियान" या महत्वाकांक्षी योजनेची घोषणा व शुभारंभ केला. सदर अभियानाअंतर्गत क्षयरुग्णांच्या मदतीसाठी **'निक्षय मित्र'** ही संकल्पना राबविण्यात येत आहे. यामध्ये क्षयरुग्णांसाठी निक्षय मित्र स्वरूपात मदत कार्य करण्यासाठी, त्यांना पोषक आहार पुरविणेबाबत शहरातील विविध स्वयंसेवी संस्था, सहकार सेवा, निवडून आलेले लोकप्रतिनिधी इ.सारख्या विविध देणगीदारांना वसई विरार शहर महानगरपालिका मा.आयुक्त, मा.उपायुक्त, मा.मुख्य वैद्यकीय अधिकारी यांनी आवाहन केले होते. या आवाहनास प्रतिसाद देत वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील ज्या क्षयरुग्णांनी मदत घेण्यासाठी संमती दिली आहे त्यांच्यापैकी आतापर्यंत ४५०० क्षयरुग्णांना ४५ निक्षय मित्रांमार्फत पोषक आहार वाटप करण्यात आला आहे.

आज दि.२९ जुलै, २०२४ रोजी ३०० क्षयरुग्णांना निक्षय मित्र **डिग्निटी सामाजिक संस्था** यांनी कोरडा पोषक आहार देण्याची तयारी दर्शवली आहे. त्यामधून शहरी प्राथमिक आरोग्य केंद्र, रानळे तलाव येथे क्षयरोग पथक विरार अंतर्गत औषधोपचार घेणाऱ्या एकूण १०० क्षयरुग्णांना निक्षय मित्र डिग्निटी सामाजिक संस्था यांच्यातर्फे प्रत्येकी ९ किलो कोरड्या पोषक आहाराचा पुरवठा करण्यात आला. यावेळी मा.उप-आयुक्त श्री.समीर भूमकर, मा.मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ.भक्ती चौधरी, मा.शहर क्षयरोग अधिकारी डॉ.राजेश चौहान यांनी क्षयरुग्णांना संबोधित केले. सदर कार्यक्रमास डॉ.संपत वळवी, श्री.जावेद शेख, मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री.दिलीप चव्हाण, समन्वयक (डिग्निटी सामाजिक संस्था), राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमाअंतर्गत कार्यरत कर्मचारी हे उपस्थित होते.

**वैद्यकीय आरोग्य विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**